॥ॐ श्रीकृष्णपरात्परायनमः॥ ॐ नमो श्रीजनार्दन ॥ सकळ
सिद्धीचे सिद्धस्थान ॥ सकळ निधीचे परमनिधान ॥ तुझे श्री
चरण सर्वार्थी ॥१॥ निधान साधावया अंजन ॥ नयनी काळि
मा घालिति जन ॥ तेणे काळ[illegible]डती नयन ॥ थितें निधा
न न देखती ॥२॥ तैसे नव्हती तुझे चरण ॥ करितां चरणरज
वंदन ॥ निःशेष काळिमा निरसे जाण ॥ परिपूर्ण निधान दा
विसी ॥३॥ अंजने साधितां निधान ॥ तेथे सळा व्यापा विवि
घ्न ॥ बळी देउनि साधिल्यां जाण ॥ नैश्वरपण तयासि
॥४॥ तैसे नव्हति तुझे चरण ॥ अवलिळा ही करितां ॥१॥

स्मरण ॥ नित्यसिद्ध अव्यय जाण ॥ निजनिधान ठसावे ॥५॥
हे साधूनिया निधान ॥ जाहले सनकादिक संपन्न ॥ नार
दाचे उदारपण ॥ येणेचि जाण वाखाणे ॥६॥ वज्रकवच प्र
ल्हादासि ॥ हेचि भांडवल गांठी त्यासी ॥ शुकादि वामदेवा
सि ॥ महिमा येणेसि पावले ॥७॥ व्यास वाल्मिक मरुवे व्हा
रे ॥ येणेचि भांडवले जाले खरे ॥ त्याचेनि भांडवले ना
नथोर ॥ ब्रह्मदुनि दारिद्रे नादती ॥८॥ त्यास गुरुचे श्रीचरण
॥ परमनिधिचे निधान ॥ येका जनार्दना शरण ॥ हे आला
परिपूर्ण भांडवल ॥९॥ येणेचि भांडवले प्रस्तुत प्रा

प्र जाले श्रीभागवत ॥ जेथे उद्धवासि श्री अनंत ॥ ज्ञान मथिता
थ सांगत ॥ १० ॥ त्यादोघीचियेकांतमातु ॥ प्रकट जाली जगा
आंतु ॥ हा परिक्षितीचा विख्यातु ॥ उपकारु लोकांतु थोर जा
ला ॥ ११ ॥ ज्याचे श्रद्धेचा आवडी ॥ शुक पावला लवडसवडी
॥ तेणे गुह्यज्ञानाचि गोडी ॥ प्रकट उघडी दाविली ॥ १२ ॥ त्या
शुकाचे नवलमहिमान ॥ कानी न सांगता गुह्यज्ञान ॥
श्रवणे तोडु निबंधन ॥ परिक्षिती जाण उद्धरिला ॥ १३ ॥ ये
थे बरि श्रवणाची गोडी ॥ प्रसिद्ध दाविली उघडी ॥ तरि अ
भाग्य दांतखिळी पाडी ॥ कानाचि नुघडी निमटली मि ॥ २ ॥
ठी ॥ १४ ॥ श्रवणी घालिता वाडेंकोडे ॥ कथासारामृत बाहि
री सांडे ॥ श्रोत्या आंतौताथे बुद्धि न पडे ॥ यालागी रडे विष
यासि ॥ १५ ॥ असो हे श्रोत्यांचि कथा ॥ कथा सांगे जो कां वक्ता
॥ तो हि तैसाचि परिता ॥ घोटु आतौता जावो नेदी ॥ १६ ॥ जैसा
गुळ उसाचा घाणा ॥ रस बाहिरी जाय माणा ॥ फिकेपणे क
रकरी गहना ॥ ते गती वदना वक्त्याचे ॥ १७ ॥ जे कथामृताचे
गोडपण ॥ ते स्वरूप विण चाखवी कोण ॥ यालागी जनार्दना
शरण ॥ जेणे गोडपण चाखविले ॥ १८ ॥ परि चाखविती उणे
खुण ॥ ते हि अभिनव आहे जाण ॥ स्वाद स्वादिता आपण ॥

होउनिगोडपणेंचाखवी ॥१९॥ बाळकाहातीदिधल्यांफळा ॥ खावेंहे
नकळेत्याअबळा ॥ त्याचेमुखीघालुनिगळा ॥ गोडीचाजिव्हाळा
जनकदावी ॥२०॥ गोडीलागल्यांबाळकासी ॥ तेचिफळेंखायेअ
हर्निशी ॥ तेवीजनार्दनेंआह्मासी ॥ गोडीश्रीभागवतासिखावि
ली ॥२१॥ ऐसीलाविलीगोडीचढोवडी ॥ तेऐज्ञालीनवलपर
वडी ॥ मजसांडितांहितेगोडी ॥ गोडीनासंडीमजलागी ॥२२
॥ तेगोडीनेंगिळिलेंमाते ॥ मीपणगेलेंगोडीआंतौते ॥ तेगोडी
चेंउथळलेंभरितें ॥ सबाह्यरीतेंउरोनेदी ॥२३॥ हेंशुकमुखीचें
श्रेष्टफळ ॥ गोडपणेंअतिरसाळ ॥ त्याचाअंगोळीविणेकेवळ ॥ ३

गोडीचीकेवळफळरूपें ॥२४॥ तेंश्रीभागवतीचीगोडी ॥ श्रीकृष्णें
निजआवडी ॥ उधवासिकडोविकडी ॥ भक्तिचिचोखडीचाखवि
ली ॥२५॥ करितांमाझेंभजन ॥ धरितांमाझेमूर्तिचेंध्यान ॥ समाधिप
र्यंतसमाधान ॥ उधवासिसंपूर्णसांगीतले ॥२६॥ हेंदेवाचेमुखी
चीमातु ॥ एकोनिचौदाव्याअध्यायांतु ॥ उधवहरिखेलाअद्भुतु तु५
॥ माझ्यानिजस्वार्थफावला ॥२७॥ मजकृष्णमूर्तिचेंध्यान ॥ सहु
जेसदाअसेजाण ॥ तेणेंचिहोयसमाधिसमाधान ॥ तरिकांप्र
श्नकरूंआतां ॥२८॥ एकोनिचौदावाअध्यावो ॥ जालाउधवासि
हादृढभावो ॥ हेंदेवोनिश्चयदेवो ॥ पुढिलअभिप्रावोसुचि
तु ॥२९॥ दृढविश्वासासिजाण ॥ करितांमाझेंभजनध्यान ॥ अ

वश्यसिद्धीउपजतीजाण ॥ त्यात्यागविघ्नलणउनि ॥ ३० ॥
श्रीभगवानुवाच ॥ श्लोक ॥ जितेंद्रियस्ययुक्तस्य जितश्वास
स्ययोगिनः ॥ मयिधारयतश्चेतउपतिष्टंतिसिद्धयः ॥ १ ॥ टीका ॥
प्राणापानजयोजयापासी ॥ इंद्रियजयोअसेज्यासी ॥ या
हीवरिउल्हासमज्ञक्तिसि ॥ चित्तेअरुनिशीमजयुक्त ॥ ३१ ॥
उधवागात्याच्याठाइं ॥ अनिवारसिद्धीउपजतीपाही ॥ येअ
र्थीसंदेहुनाही ॥ जेजेसमइंजेइछि ॥ ३२ ॥ ऐसेंउधवेऐकतां ॥
॥ चमत्कारुजालाचित्ता ॥ समूळसिद्धीचीकथा ॥ श्रीकृस
नाथापुसोपा ॥ ३३ ॥ उधवउवाच ॥ श्लोक ॥ कयाधारणया ॥ ४ ॥

कास्वित्कथंवासिद्धरच्युत ॥ वविवासिद्धयोब्रूहियोगिनांसिद्धि
दोभवान् ॥ २ ॥ टीका ॥ कोण्याधारणकोणसिद्धि ॥ तेसांगो
वीविधानविधी ॥ संख्याकितिसकळसिद्धि ॥ तेहिकृपा
निधिसांगिजो ॥ ३४ ॥ यांसकळसिद्धीचीकथा ॥ तूएकजा
णतातत्वता ॥ तेमजसांगिजेअच्युता ॥ तूसिद्धिदातायो
गियां ॥ ३५ ॥ श्रीभगवानुवाच ॥ श्लोक ॥ सिद्धयोष्टादशप्रो
क्ताधारणायोगपारगैः ॥ तासामष्टौमत्प्रधानादशैवगु
णहेतवः ॥ ३ ॥ टीका ॥ सिधिअष्टादशजाण ॥ त्याचीधा
रणभिन्नभिन्न ॥ ऐसेंबोलिलेयोगयज्ञ ॥ योगसंपन्न

महासिद्ध॥३६॥यानावंसिद्धीगासमस्ता॥यातुअष्टमासिद्धी
विख्याता॥त्यामाझेस्वरूपस्थिता॥आणिकासितलता
त्यानाहीं॥३७॥मनसावाचाकर्मणजाण॥विसरोनिदेहा
चेदेहपण॥माझेनिस्वरूपेंअतिसंपन्न॥चैतन्यघनजेझा
ले॥३८॥त्यापासीयासिद्धिजाण॥उभ्याअसतीहातजो
डुन परितोनपाहेथुंकून॥निचाडजाणयापरि॥३९
॥इतरदाहासिद्धिचीकथा॥ज्यासत्वगुणगुणभूता॥
साधकशुद्धसत्वात्माहोता॥त्यापासीसर्वथाप्रकटती॥
४०॥अष्टमासिद्धिचीकथा॥तुजमीसांगेनतत्वता॥ज्यामा ॥२॥

झेस्वरूपींस्वभावता॥असतिवर्तताआदिनिशि॥४१॥श्लोक
॥अणिमामहिमामूर्त्तेर्लघिमाप्राप्तिरिंद्रियैः॥प्राकाश्यंश्रु
तदृष्टेषुशक्तिप्रेरणमीशिता॥४॥गुणेष्वसंगोवशितायत्का
मस्तदवस्यति॥एतामेसिद्धयःसौम्यअष्टावौत्पत्तिकामताः
॥५॥टीका॥अणिमामहिमालघिमास्थिती॥यातिन्हीदेह
सिद्धीचेप्राप्ती॥प्राप्तिरिंद्रियजेवदंति॥तेजाणचौथीमहा
सिद्धी॥४२॥प्राकाश्यश्रुतदृष्टता॥तेपांचवीसिद्धीसर्वथा
॥शक्तिप्रेरणअसंगछिता॥हेजाणतत्वतासाहवी॥
सिद्धी॥४३॥माझा:धमजेथेवंशहोती॥तेवशितांबोलिजे॥

॥६॥ सिद्धांती ॥ तेसातवें सिद्धीची वदंती ॥ जाण निश्चितिउद्धवा
४४ ॥ त्रैलोकीभोगजेनिरोपम ॥ तेनकरितां परिश्रम ॥ इच्छामा
त्रेउत्तमोत्तम ॥ भोगसुगमहोंलागे ॥ ४५ ॥ यत्कामस्तदवश्यति
॥ इच्छिल्याकामसुखाचिप्राप्ती ॥ त्रिभुवनीचीभोगसंपती ॥
येकेचिकाळेयेअवचिती ॥ तेजाणपांखातिआठवीसिद्धी
४६ ॥ याअष्टमासिद्धीचीरासी ॥ स्वभावेंअसेमजपासि ॥ सा
धकासिएतांप्रयासि ॥ येकाधिकोणासिउपतिष्टे ॥ ४७
॥ हेमजसिद्धिचिमुत्पत्ती ॥ इतरदाहाज्याबोलीजति
त्याहिसांगेनतुजप्रति ॥ यथानिगुत्तिउद्धवा ॥ ४८ ॥ श्लोक ॥ ॥६॥

अनूर्म्मिमत्वंदेहेस्मिन्दूरश्रवणदर्शनं ॥ मनोजवःकामरूपंपर
कायप्रवेशनं ॥ ६ ॥ स्वछंदमृत्युर्देवानांसहक्रीडानुदर्शनं ॥ यथा
संकल्पसंसिद्धिराज्ञाप्रतिहतागतिः ॥ ७ ॥ टीका ॥ देहीबा
धीनाउर्म्मिसाही ॥ तेअनोर्मिसिद्धीपाहि ॥ जीपाहीं ॥ दुरीचा
वाचाएकेठांइं ॥ दुरश्रवणनवाइ दुसरीसिद्धी ॥ ४९ ॥ त्रै
लोकीचासोहळा ॥ बैसलेठाइंदेखेडोळा ॥ तीसरेसि
द्धीचिलीळा ॥ दूरदर्शनकळातीनाव ॥ ५० ॥ मनोजवा
सिद्धिऐसीआहे ॥ कल्पिल्याठायासिपाहे ॥ मनोवेगेंश
रीरजाय ॥ चौथीहोयहेसिद्धी ॥ ५१ ॥ कामरूपसिद्धीची

॥७॥ परि जेस्यारूपाचि कामना करी तेसें रूप तत्काळ धरी हे पा
चवी खरी कामना सिद्धी ॥ ५२ ॥ आपुलें शरीर ठेउनि दुरि प्रवेश
परशरीरीं करी हे परकायाप्रवेश परि साहावी सा जिरी अ
तिसिद्धी ॥ ५३ ॥ काळासि वश्य नाहीं होणें आपुलें इछा म
रणें हे सातवी सिद्धि जाणणें स्वछंद मरणें तीनाव ॥ ५४
॥ स्वर्गीं देवाचें जे क्रीडन त्याचें हा देखे दर्शन स्वयें क्रि
डावया आंगवन तें सिद्धी जाण आठवी ॥ ५५ ॥ जैसा संक
ल्पें तैसी सिद्धी तें नववी जाण यां त्रिशुद्धी राजा हि आज्ञा
शिरीं वंदी ज्याची गमनसिद्धी सर्वत्र ॥ ५६ ॥ ज्याचि आज्ञा ॥७॥

आणि गमन कोठें हि अवरोधे ना जाण हे दाहावें सिद्धीचे
लक्षण ज्ञान विचक्षण जाणति ॥ ५७ ॥ या गुणें हेतु सि
द्धि विविधि म्या सांगीतली हे त्रिशुद्धी याहीहुनि क्षु
द्रसिद्धी त्याहि निजबुद्धी अवधारी ॥ ५८ ॥ श्लोक ॥ त्रिका
लज्ञत्वमद्वंद्वं परचित्ताद्यभिज्ञता ॥ अग्न्यर्कांबुविषादीनां
प्रतिष्टंभोपराजयः ॥ ८ ॥ टीका ॥ क्षुद्रसिद्धि पंच लक्षण भू
त भविष्य वर्तमान या त्रिकाळाचें जे ज्ञान तें पाहिलें जा
ण येथ ठाकें ॥ ५९ ॥ सुखदुःख शीत उष्ण मृदु आणि अति
कठिण या द्वंद्वासि वश्य न के जाण तें दुसरें लक्षण सिद्धि

चे ॥ ६० ॥ परावेस्वप्नस्वयेंसांगणे ॥ पुढिलाचेचित्तींचेजाणणें ॥
हेतीसरीसिद्धीलक्षणे ॥ एकलक्षणेचौथीची ॥ ६१ ॥ अग्नी
वायूआणिउदक ॥ शस्त्रविषआणिअर्क ॥ याचेप्रतिस्थंभन
देख ॥ तेसिद्धीनिष्टंकपैचौथी ॥ ६२ ॥ कोणासिजिंकिना
नवचेपाहे ॥ जेथीचातेथेविजइहोये ॥ येकलासर्वत्रजयो
लाहे ॥ हेपाचवीआहेविजयसिद्धी ॥ ६३ ॥ श्लोक ॥ एताश्चो
द्देशतःप्रोक्तायोगधारणसिद्धयः ॥ ययाधारणयायास्या
द्यथावास्यान्निबोधमे ॥ ९ ॥ टीका ॥ उद्देशमात्रेसिद्धी
रीगती ॥ म्यांसांगीतलीतुजप्रति ॥ आताकोणधारणकें ॥ ८ ॥

णस्थिती ॥ सिद्धीचीप्राप्तीहोयतेऐक ॥ ६४ ॥ अणिमासिद्धीची
धारणा ॥ गुणदेहतुदाहासिद्धीजाण ॥ क्षुद्रसिद्धीपंचलक्षण ॥
त्यांआसाधित्यांसाधनाहरीबोले ॥ ६५ ॥ श्लोक ॥ भूतसूक्ष्मा
त्मनिमयितन्मात्रंधारयेन्मनः ॥ अणिमानमवाप्नोतितन्मा
त्रोपासकोमम ॥ १० ॥ टीका ॥ अष्टमहासिद्धीस्वभाविका ॥
माझ्याठाइंअसतिदेखा ॥ यासाध्यसाधाव्याआणवाका ॥
करितासाधकासाधनसांगे ॥ ६६ ॥ मीअणुरेणुबाहिरेण ॥
जीवाचाहृदयस्थजाण ॥ तेथेअणुतन्मात्रकरूनि
मन ॥ माझ्याठाइंजाणजोराखे ॥ ६७ ॥ अणुतन्मात्रध्या

श्री ०१

नसदाराहे ॥ त्याचाअणुमात्रविदेहहोय ॥ किटकीभृंगीच्या
ऐसेपाहे ॥ आणिमेचिलाहेतोसिद्धी ॥ ६८ ॥ तोअछिद्रीरिघो
निजाये ॥ जगाच्याडोळ्यामाजिसामाये ॥ कोठेहिखुपेना
पाहे ॥ हेआणिमेचिलाहेमहासिद्धी ॥ ६९ ॥ श्लोक ॥ महत्या
त्मन्मयिपरेयथासंस्थंमनोदधत् ॥ महिमानमवाप्नो
तिभूतानांचपृथकपृथक ॥ ११ ॥ टीका ॥ माझेस्वरूपअ
नंतअपार ॥ महत्तत्वहेनिअत्तिथोर ॥ आणिमहत्त-
त्वाचाहिसाचार ॥ नियंताईश्वरजोकामी ॥ ७० ॥ तात्त
त्विसाधावयानर ॥ माझीधारणधरीअपरापर ॥ [illegible]हे ॥ वा १०

डचिहोयत्याचेशरीर ॥ हेसिद्धीमहाथोरमहि[illegible]
७१ ॥ सूक्ष्मकापुसाचेतंतुपाहे ॥ तोकल्पनेऐसापटुहोये ॥
माझीमहतिधारणजोवाहे ॥ तोमाझीसिद्धीलाहेम
हिमले ॥ ७२ ॥ तुकितात्याच्यासमानभारा ॥ तुपुरपर्वतस
गळीधरा ॥ येऊढयामहत्वाचाउभारा ॥ सिद्धीबारातो
पावे ॥ ७३ ॥ श्लोक ॥ परमाणुमयेचित्तंभूतानांमायिरंजयतू ॥
काळसूक्ष्मार्थतांयोगीलघिमानमवाप्नुयात् ॥ १२ ॥ टीका ॥
वायामादिप्राणपरिमाण ॥ जेणेकाळसूत्राचेगणन ॥
तोपरमाणुरूपभगवंतजाण ॥ त्याचेचिदृढध्यानस

॥१०॥ दाजोकरी ॥ ७४ ॥ परमाणुधारणेचीमहिमा ॥ त्याआदेशसिये अति
लघिमा ॥ तोमस्तकीचढोनिपाहेमा ॥ उडेव्योमामाजिसुखें ॥ ७५ ॥
अणिमादिती न्हीधारणा ॥ यादेहीच्याचिसिद्धिजाणा ॥ ज्ञाहान
थोरहलूपणा ॥ देहलक्षणउपजवी ॥ ७६ ॥ उरल्याज्यापंचमहा
सिद्धी ॥ त्याचेधारणेचीविधी ॥ तेहीसांगेनगात्रिशुद्धी ॥ एकसु
बुद्धीउद्धवा ॥ ७७ ॥ श्लोक ॥ धारयन्मय्यहंतत्त्वे मनो वैकारिके खि
लं ॥ सर्वेंद्रियाणामात्मत्वं प्राप्तिं प्राप्नोति मन्मनाः ॥ १३ ॥ टीका ॥ मू
ळीचाशुद्ध अहंकार ॥ ज्यापासुनि इंद्रियविकार ॥ इंद्रियआ
धिष्टात्रिसुरवर ॥ चेतविताईश्वरजोकामी ॥ ७८ ॥ त्यामाझ[illegible]
धारणाधरिता ॥ इंद्रियआधिष्टात्रिदेवता ॥ त्यासिय[illegible] नि

यकात्मता ॥ इंद्रियप्रकाशकता स्वयेंलाहे ॥ ७९ ॥ तेव्हांइंद्रिय
व्यापारजगाचे ॥ प्रकाशुनिहादेखसाचे ॥ येव्हांहियेंइंद्रियप्राप्ती
चे ॥ साधीसिद्धीचवैभवता ॥ ८० ॥ तेव्हांज्यावाजोजेथेपाहे ॥ इंद्रि
याचाव्यापारहोये ॥ तोयेणेचिकेलाआहे ॥ ऐसीप्रतितिहोयइं
द्रियप्राप्ती ॥ ८१ ॥ श्लोक ॥ महत्यात्मनि यः सूत्रे धारयेन्मयि मा
नसं ॥ प्राकाश्यं पारमेष्ठ्यं मे विंदतेऽव्यक्तजन्मनः ॥ १४ ॥ टीका ॥ जे
महत्तत्वगाजाणे ॥ मायेचेंतिप्रथमस्फुरणें ॥ ज्यासिसिक्रिया
सूत्रप्रधान ॥ नामाभिधानबोलती ॥ ८२ ॥ तेथेअजन्मामी
आपण ॥ जालोसूत्राचासूत्रात्माजाण ॥ त्यामाझ्यास्वरूपा

चे ध्यान ॥ सावधान जो करी ॥ ८३ ॥ ज्या सूत्राचेनि प्रकाशें प्रवाहे ॥ ब्र
ह्मांड हिरण्य प्रकाशला राहे ॥ ते प्रकाशता त्यासि वश होये ॥ येण
सूत्रात्मा पाहे निज ध्यासने ॥ ८४ ॥ त्या निज ध्यासनाचा पोटी ॥
करूं शके ब्रह्मांड कोटी ॥ येवढी प्रकाश्य सिद्धी गोमटी ॥ हे मज
विण नुठी साधकां ॥ ८५ ॥ श्लोक ॥ विष्ण्वधीश्वरे चित्तं धारयेत्का
लविग्रहे ॥ सदृशित्वमवाप्नोति क्षेत्रज्ञ क्षेत्रज्ञचोदनं ॥ १५ ॥ टीका ॥
मायादि त्रिगुण नियंता ॥ जो कळिकाळा तें आकळिता ॥ उत्प
ति स्थिती प्रळय कर्ता ॥ जाणता तो अंतर्यामी ॥ ८६ ॥ त्या मज
विष्णुचे ध्यान ॥ निरंतर जो करी जाण ॥ त्यासि अदृष्टदृष्टेपण ॥ श ॥१२॥

क्ती प्रेरण दृश्य लये ॥ ८७ ॥ मिथ्या बुधि बळाच्या खेळा प्रति ॥ खेळ गा
रजाणे गति विगती ॥ तेवी मिथ्या संसारा प्रति ॥ भूतांची आगती ॥ ने
गती स्वये जाणे ॥ ८८ ॥ तो जीवादि शरीर प्रेरणे ॥ स्वयें करूं शके
आपण ॥ करितां अंतर्याम्याचें ध्यान ॥ येवढी सिद्धी जाण उप
तिष्टे ॥ ८९ ॥ तो आपुलेनि प्रतापस्वभावी ॥ मशका हातीं मेरू
विभांडवि ॥ काडें प्रांतें मारवी ॥ उंदिराहातीं ॥ ९० ॥ यावरीये
कांतें मारवी ॥ जिवें गेल्यां जिववी ॥ अचेतना तें पाल्हेजवी ॥ ये
सिद्धीची पदवी दृश्य ॥ ९१ ॥ श्लोक ॥ नारायणे तुरीयाख्ये भग
वच्छब्द शब्दिते ॥ मनो मय्यादधद्योगी मद्धर्म वशितामियात् ॥ १६ ॥

॥ टिका ॥ जीवशिव आणि प्रकृती ॥ याहुनि पर चौथी स्थिती ॥
ज्याते नारायण ह्मणती ॥ यथानिगुति संज्ञान ॥ ओ २ ॥ जागृती
स्वप्न सुषुप्ती ॥ यावेगळी तुर्या स्थिती ॥ त्याते नारायण ह्मण
ती ॥ यथानिगुती संज्ञान ॥ ओ ३ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन ॥ यां अतीत
चौथा जाण ॥ त्याते ह्मणती नारायण ॥ ज्ञानविचक्षण निज
बोधे ॥ ओ ४ ॥ त्रिपुटी वेगळी जे मातु ॥ असो नियां त्रिपुटी आंतु ॥
जो कां त्रिपुटीसी अलिप्तु ॥ तो मी विख्यातु नारायण ॥ ओ ५ ॥ य
षश्री वैराग्य ज्ञान ॥ ऐश्वर्य औदार्य हे षड्गुण ॥ नित्य वसती
परिपूर्ण ॥ तो मी नारायण भगवंतु ॥ ओ ६ ॥ त्या मज नाराय

णातें ध्याता ॥ माझी वशिता सिद्धी ये हातां ॥ सबक मी इं
लिप्तता ॥ भोगुनी अभोक्ता भोगाते ॥ ओ ७ ॥ श्लोक ॥ निर्गुणे
ब्रह्मणि मयि ॥ धारयन्विषदं मनः ॥ परमानंद माप्नोति यत्र
कामोवसीयते १७ ॥ टीका ॥ चित्त देवता सत्वगुण ॥ इंद्रियें
तो रजोगुण ॥ विषय केवळ तमोगुण ॥ हे चि आवरण परमा
नंदा ॥ ओ ८ ॥ परमानंदासी आवरण ॥ आडवे असती तीन्ही
गुण ॥ त्याते सांडुनी निर्गुण ॥ ब्रह्म परिपूर्ण जो मज ध्याये ॥
ओ ९ ॥ त्यासी माझिये ध्यानस्थिती ॥ होय परमानंद अ
वाप्ती ॥ ज्या आनंदा माजि उपशपाती ॥ होय निश्चिती सकळ

॥१४॥ कामा ॥१००॥ जालया परमानंदप्राप्ती ॥ सकळकाम निमग्न होती
ती ॥ जेवी सूर्योदया प्रति ॥ तारा हारपती सचंद्र ॥१॥ तेवी परमा
नंदाचा पोटी ॥ हारपति कामकोटी ॥ तेथे इंद्रियसुखाच्या
गोष्टी ॥ लाजोनी उठाउठी विराल्या ॥२॥ उद्धवा ऐकपां निश्चि
ती ॥ न व्हता परमानंदप्राप्ती ॥ कदा न व्हे कामनिवृत्ती ॥ ना
ना युक्ती करिताही ॥३॥ या अष्टमा सिद्धीच्या धारणा ॥
तुज म्यां सांगीतलीयां जाणा ॥ यासी साधावया आंगव
णा ॥ सुरनरगणां पैं नाही ॥४॥ यापरि अष्टमा सिद्धी तुज
म्यां सांगीतली धारणविधि ॥ आतां गुणहेतुकाचे प्रबो
धी ॥ सावधबुद्धी अवधारी ॥५॥ श्लोक ॥ श्वेतद्वीपपतौ ॥१३॥

चित्तं शुद्धे धर्ममये मयि ॥ धारयन् श्वेततां याति षडूर्मिरहितो
नरः ॥१०॥ टीका ॥ सांडुनी कार्यें सी रजतमे दुरी ॥ जो मी सत्त्वा
धिष्ठात्रि श्रीहरी ॥ त्या माजि जो धारणा धरी ॥ अखंडाकारें
सर्वदा ॥६॥ तो माझेनि सत्त्वें सत्त्ववंतु ॥ होय षडूर्मि रहितु ॥
शोक मोह जरा मृत्यु ॥ क्षुधा तृषा हा तुलाउ नश्यके ॥७॥ श्लो
क ॥ मय्याकाशात्मनि प्राणे मनसा घोषमुद्वहन् ॥ तत्रोप
लब्धा भूतानां हंसो वाचः शृणोत्यसौ ॥११॥ टीका ॥ स
घोष प्राणेसि शब्दमहिमा ॥ अवश्य विश्रांतीसी ये आ
मा ॥ त्या आकाशाचा महिमा आत्मा ॥ मज माजि ब्योमा र

हिवासु ॥ ८ ॥ तोमीसघोषप्राणचाहिप्राण ॥ सकळवाचांचिवाचा
जाण ॥ वागेश्वरीचेजीवण ॥ सत्यमीजाणउद्धवा ॥ ९ ॥ ऐसियामा
झेहृदध्यान ॥ निजहृदईंजोकरीजाण ॥ तोविचित्रावाचावे
श्रवण ॥ जीवस्वरूपेजाणस्वयेंऐके ॥ १० ॥ सनादमाझीधारण
पोटी ॥ धरितांजगाच्यागुह्यगोठी ॥ त्यांचेपडतीकर्णपुटी ॥ तेका
ळीनगीदुरश्रवणसिद्धी ॥ ११ ॥ श्लोक ॥ चक्षुस्त्वष्टरिसंयोज्यत
ष्टारमपिचक्षुषि ॥ मांतत्रमनसाध्यायन्विश्वंपश्यतिसूक्ष्म
दृक् ॥ २० ॥ टीका ॥ सवितातोमीनारायण ॥ ऐसेडोळयामाजि
करिध्यान ॥ तिकांडोळाचिमदपेजाण ॥ सवितात्र्यापणस्वये ॥ १५ ॥

होय ॥ १२ ॥ एवंडोळासवितामाझेंध्यान ॥ तिहूसीयेकात्मताजा
ल्याजाण ॥ तेव्हासुक्ष्मदृष्टहोयआपण ॥ जगसंपूर्णतोदेखे ॥ १३ ॥
बैसलेचिठाईंजाण ॥ चतुर्दशभूवनाचेलक्षण ॥ दर्शनियकेका
ळेदेखेआपण ॥ दुरदर्शणहेसिद्धी ॥ १४ ॥ श्लोक ॥ मनोमयिसुसं
योज्यदेहंतदनुवायुना ॥ मद्धारणानुभावेनतत्रात्मायत्र
वैमनः ॥ २१ ॥ टीका ॥ अत्यंतसवेगतेमन ॥ त्यामनाचेहो
मीमीमनजाण ॥ त्यामनासीमजअभिन्न ॥ प्राणधारण
युक्तराखे ॥ १५ ॥ ऐसेप्राणधारणायुक्तमन ॥ मजसीरा
खताअभिन्न ॥ त्याधारणाप्रभवेजाण ॥ मनोवेगेगमन

देहासीहोय ॥१६॥ जेथेसंकल्पेजायमन ॥ तेथेहोयदेहाचेगे
मन ॥ हिमनोजवसिद्धीजाण ॥ धारणालक्षणयाहेतु ॥१७॥
श्लोक ॥ यदामनउपादाययद्यद्रूपंबुभूषति ॥ तत्तद्भवेन्म
नोरूपंमद्योगबलमाश्रित: ॥२२॥ टीका ॥ पहिलिमनोजव
धारणा ॥ त्याहिवरिमाझीभावना ॥ अचिंत्यसामर्थ्यमाझेजा
ण ॥ अनुसंधानाजोआणि ॥१८॥ मीनानारूपेतेंधरिता ॥ स
वेचिरूपांतरेंविसर्जिता ॥ ऐसिमाझिजेसंपूर्णसत्ता ॥ तेत्या
आलिता स्वयेंलाभे ॥१९॥ एवंमाझियादृढधारणा ॥ माझेसा
मर्थ्ययेत्याच्यामना ॥ मगज्यारूपाचीकरिभावना ॥ तद्रूपजा ॥१५॥

णास्वयेंहोये ॥२०॥ सुरनरपन्नगामाझारिजेरूप ॥ धराआतोकरि
संकल्प ॥ तोतत्कालगातद्रूप ॥ हेकामरूपसिद्धीमाझी ॥२१॥
श्लोक ॥ परकायंविशन्सिद्धआत्मानंतत्रभावयेत् ॥ पिंडंहि
त्वाविशेत्प्राणवायुभूत:षडंघ्रिवत् ॥२३॥ टीका ॥ परकायाप्र
वेशुकरितांजाण ॥ आवरूनीस्वयेंदेहीचासर्वप्राण ॥ ते
थेप्रवेशकरणेंआपण ॥ तेथेआपुलीभावनाकरावी ॥२२॥
तेव्हांलिंगदेहाचेमाथां ॥ जीवप्राणाचीयेकात्मता ॥ धरूनी
देहांतरअरुता ॥ बाह्यवायुच्यापंथामिळोनिजाय ॥२३॥
तेथेमिळताचिमिळनी ॥ यादेहाचाअभिमानसांडुनी ॥

॥१६॥ देहांतरिं प्रवेशोनी । मी म्हणउनी उठी तेथे ॥ २४ ॥ जैसे कमळी
होउनी कमळांतरा । वायुबळे प्रवेशणे भ्रमरा । तैसे सांडुनी
स्वशरीरा । देहांतरा जिउ जाये ॥ २५ ॥ हे परकायाप्रवेशण ।
म्या सांगीतले संपूर्ण । माझ्या स्वरूपाचे धारण । ते निज ।
लक्षण अवधारी ॥ २६ ॥ हे उ० ध्याता माझ्या स्वरूपासी । ते
सर्व देही तूचि आहेसी । न संडितां निज देहासी । हा पर
कायेसी प्रवेशु ॥ २७ ॥ स्वसत्ता स्वयें देह सांडणे । ते अर्थी
ची लक्षणे । पुढे श्लोकी नारायणे । विषद निरोपणे नि
रोपी ॥ २८ ॥ श्लोक । पाष्ण्यापीड्य गुदं प्राणं हृदुरःकंठमूर्धसु । ॥१६

आरोप्य ब्रह्मरंध्रेण ब्रह्म नीत्वोत्सृजेत्तनुं ॥ २४ ॥ टीका ॥ देहत्या
गावें प्राण धारण । तेचि स्वच्छंद मृत्युचे लक्षण । तदर्थी जे प्रा
णक्रमन । ते योगधारण अवधारा ॥ २९ ॥ मूळाधारीं वामच
रण । टांचेचेनि नेटे जाण । आपाणेंचे अधोगमन । गुदपि
डुनि राखावें ॥ ३० ॥ हृदई विचरता जो प्राण । त्याचे सदा ।
र्ध्वगमन । तो प्राण यामे आवरून । अधोमुख जाण क
रावा ॥ ३१ ॥ आपाणेंचे उर्ध्वगमन । स्वाधिष्टानपरियंत
जाण । प्राणाचे अधसंचरण । तेचि चक्र नाण जै घडे
॥ ३२ ॥ तेथ प्राणापानाची बुझावण । त्याचे कामाजिक

रिसमान । ऐकेपडिले आलिंगन । येकात्मताजाएचालि
ले ॥ ३३ ॥ सांडुनी अपानाची अधोवाट । प्राणे त्यजिलाहृद
यकंठ । फोडुनी सुषुम्नेचे कपाट । ऊर्ध्वमुखे नीट चालिले ॥
३४ ॥ जीएतां सुषुम्नेचे घर । भेदले साही चक्राचे पदर । उ
घडुनी कांकी मुखीचे द्वार । ब्रह्मरंध्र ठाकिले ॥ ३५ ॥ तेथे
पावल्या यथानिगुती । या देहाची सांडुनी स्थिति । जो का
मभोग वाहे चित्ती । त्या देहाची प्राप्ती तो पावे ॥ ३६ ॥ वैकुं
ठ कैलास अमरावती । सार्वभौम चक्रवर्ती । जे कामना
कामी चित्ती । ते पावे गती तत्काळ ॥ ३७ ॥ जरि तो ब्रह्मसा ॥ १७

युज्यता वाहे । तरि सांडुनी देहाची सोये । शुद्ध ब्रह्म धारणा
पाहे । तो ब्रह्म चि होय स्वतसिद्ध ॥ ३८ ॥ या परि प्राणधार
णा । करुनी जो वर्ते जाणा । ते स्वछंद मृत्युचे लक्षण । त्या
आधीन कळिकाळ ॥ ३९ ॥ श्लोक ॥ विहरिष्यन्सुराक्रीडे
मत्स्थं सत्वं विभावयेत् । विमानेनोपतिष्ठंति सत्ववृतिःसु
रस्त्रियः ॥ २५ ॥ टीका ॥ देवाचे दिव्य भोगी आशक्त । योगिया
चे जाल्यां चित्त । ते प्राप्ती लागी येथ । माझे सत्व निश्चित चिं
तावे ॥ ४० ॥ जेणे सत्वे म्या जाण । स्वर्गी स्थापिले सुरगण ॥
त्या सत्वगुणाचे धारण । निजहृदई जाण जो राखे ॥ ४१ ॥ ध्या
तां सुरस्त्रियाची कामनिष्टा । तो पावे सुरस्वर्गाची प्रतिष्टा

विमानिचळोनीवरिष्टा ॥ करिकामचेष्टाअक्षरांसी ॥ ४२ ॥ श्लो
क ॥ यथासंकल्पयेबुध्यायदावामत्परःपुमान् ॥ मयिसत्येम
नोयुंजन्‌तथातत्समुपाश्नुते ॥ २६ ॥ टीका ॥ संकल्पमात्रेक
रिसमस्त ॥ जोमीसत्यसंकल्पभगवंत ॥ त्यामाझाठाइंचि
त्त ॥ विश्वासयुक्तजोराखे ॥ ४३ ॥ जोजेजेकाळीजेजेदेशी
॥ जेजेकर्मीजेजेअवस्थेसी ॥ जेजेकाहीवांछीमानसी ॥ ते
संकल्पत्यापासीसदासफळ ॥ ४४ ॥ मीसत्यसंकल्पभग
वंत ॥ हृदइंधरिलियांध्यानयुक्त ॥ त्याचेजेजेकामकामीचि
त्त ॥ तेसंकल्पप्राप्तहोतीत्यासी ॥ ४५ ॥ श्लोक ॥ योवैमद्भावमाप
न्नईशितुर्वशितुःपुमान् ॥ कुतश्चिन्नविहन्येततस्यचा ॥१८॥

ज्ञायथामम ॥ २७ ॥ टीका ॥ जोकांमीसर्वांचानियंता ॥ स्वयेस्व
तंत्रतत्वता ॥ त्यामाझेध्यानकरितां ॥ मद्भावताउपतिष्ठे
॥ ४६ ॥ मीचिभगवंतसुनिश्चित ॥ ऐसेंबोधाआलेंयथास्थि
त ॥ त्याचीआज्ञासुरनरवंदित ॥ पशुपक्षीनुल्लंघितते आ
ज्ञा ॥ ४७ ॥ जैसीमाझीआज्ञासर्वावरि ॥ तैसीत्याचीआज्ञा
चराचरि ॥ कोणीनुलंघीतिळभरि ॥ हेआज्ञासिद्धीख
रितोलाभे ॥ ४८ ॥ एवंयागुणहेतुसिद्धिदाही ॥ धारणायुक्त
सांगीतल्यापाही ॥ आताक्षुद्रापंचसिद्धीज्यापाही ॥ तुजमी
त्याहीसांगेन ॥ ४९ ॥ श्लोक ॥ मद्भक्त्याशुद्धसत्वस्य ॥

योगिनो धारणाविदः ॥ तस्य त्रैकालिकी बुद्धिर्जन्ममृत्युप
बृंहिता २८ ॥ टीका ॥ जगाचे उत्पत्ती स्थिती निदान ॥ सत्य असे
मज आधिन ॥ त्या माझा ठाइं करितां भजन ॥ अंतःकरण अ
तिशुध ॥ ५० ॥ ते शुध अंतःकर्णी जाण ॥ भूत भविष्य वर्तमान
॥ जगाचे जन्म भोग मरण ॥ हे त्रिकाळज्ञ सिधी प्रकटे ॥
५१ श्लोक ॥ अग्न्यादिभिर्न हन्येत मुने योगमयं वपुः ॥
मद्योगश्रांतचित्तस्य यादसामुदकं यथा ॥ २९ ॥ टीका ॥ अ
तिप्रयास करितां चित्त ॥ मजसी योगा तेजा लें प्राप्त ॥ येणे
योगे शरीर योगयुक्त ॥ अबाधित माहा वन्ही ॥ ५२ ॥ त्या ॥१९

सी बाधी ना सी तत्व ॥ म्हणु आणिक कां कठिण ॥ अग्निला
गलिया जाण ॥ देह दहन न करे त्यासी ॥ ५३ ॥ ते अग्नी माजि वि
श्रांति त्यासी ॥ जेवी कां जळी जळचरासी ॥ अहंदता सिद्धी ऐसी
॥ साधकांसी उपतिष्ठे ॥ ५४ ॥ ये सिद्धीचा धारण ॥ प्रतिष्टंभ सि
द्धी प्रकटे जाण ॥ एकतीच्या हो लक्षण ॥ जीचे तोडरि जा
ण सकळ बाधा ॥ ५५ ॥ त्यासी बाह्य वायुचे निशडाडे ॥
बाधकता कदा न घडे ॥ प्राण जितोनी आंतुली कडे ॥ क
रितां कडेदासी त्यासी ॥ ५६ ॥ देठु फेडोनी सुमनसेजे
॥ जेवी कां सुखनिद्रा कीजे ॥ तेवी हूं गळा वरि हा निजे ॥

बाधानुपजे अग्नीची ||५७|| सीतळ जळि सीतकाळी || सि
धु बुडविल्या कौतुकाळी || तो बाहिरी निघाल्या नतळ
मळी || जळी मासोळी तेवी क्रीडे ||५८|| ग्रिष्म काळीचे
दाघ उष्ण || त्या माजि सिंधु घातल्यां जाए || रवी करी
पद्म उल्हासे गहन || तैसे लागता उष्ण तो रवटवी ||५९
यापरि अर्क बाधक ता त्यासी बाधीना सर्वथा || तैसी
सिद्धासी शस्त्रे लागती || शस्त्र घाता तो ना तुडे ||६०||
आकाश खोचु जाता पाहे || शस्त्रे सी घावो वायां जाये || 
ते [illegible] सिद्धीसी न लगती घाये || शस्त्र उपाये सुनाट ||६१

सिद्ध [illegible] सदा धल्यां विख || विखही त्यासी न व्हे बाधक || जेवी वि
ख कीडे विखी देख || यथा सुखे क्रीडती ||६२|| छाया पर्वतातळी
दडपिता || ते दाटेना जेवी पर्वता || तेवी अग्नी अर्क विष अंबु वा
ता || सिद्धासी सर्वथा बाधीना ||६३|| ऐको नी सिद्धीची कथा
||उल्हासु मानिसी चित्ता तरि माझे प्राप्तीसी तळवता || सिद्धी
सर्वथा बाधका ||६४|| माझे स्वरूप शुद्ध अद्वैत || तेथे सिद्धी
चे जे मनोरथ || तो लोकरंजन समस्त || नाही परमार्थ सिद्धी
माजि ||६५|| मागिले चि श्लोक संधी || परचित्ताभिज्ञ तेचि
सिद्धी ध्वनी ते सु चि जो त्रिशुद्धी || तीही हा विधि अवधा

रि ६६ तेचिश्लोकींचे व्याख्यान करितां भगवंताचे ध्यान प्र
कृतिनियंता आपण साक्षी जाण सर्वांची ६७ ऐसे ईश्वरत्व दृ
ढ ध्यातां चित्त चाळकता ये त्याच्या हातां तेव्हां चित्ता ची
चिंताभिज्ञता स्वभावता उपतिष्टे ६८ तेव्हां जिवाची स्व
प्नावस्था हार... क्षिले देखतां जो जो संकल्पज्या चित्ता
ते स्वभावता होऊ जाए ६९ जीव्हारीची जे आवडी मोठी
तेहा अवळी व्यासांगे गोष्टी येव्हढिये सिद्धीचा कसवटी
उठा उठी तो लाभे ७० श्लोक मद्विभूतिरभिध्यायन् श्री
सास्त्रविभूषिता ध्वंजातपत्रव्यजनैः सभवेदपराजि 

:३०० टीका अपराजयसिद्धीचे प्राप्ती ध्याना आणवी
माझी मूर्ती जीचेनि नावे जयो पावती जाण निश्चिती सुख
र ७१ चतुर्भुज मेघश्याम शंख चक्र गदा पद्म छत्रातपत्र
चामरयुग्म ध्वजी उत्तम गरूड लांछन ७२ रत्नदंडे झाए
कार यजनविंजिती सनागर चरणी गर्जतती तोडर तोड
रि अपार अरिवर्ग ७३ ऐसिये माझे मूर्तीचे ध्यान जो
सर्वदा करि सावधान तो सर्वत्र विजई जाण अभंग
जाण माझेनि ७४ तो माझेनि ध्यानें पाहें कोणी न मेळ
वी तासाहे येकला सर्वत्र विजई होये ऐसी सिद्धी ला

हेयानिष्टा ॥ ७५ ॥ मिहृदद्वंधरिल्यांअजितु ॥ तोसर्वत्रहोयेअ
पराजितु ॥ ऐसेसांगोनियांभगवंतु ॥ उपसंहरितुसिद्धीते ॥ ७६
॥ श्लोक ॥ उपासकस्यमामेवंयोगधारण्यामुनेः ॥ सिद्धयःपूर्व
कथिताउपतिष्टंत्यशेषतः ॥ ३१ ॥ टीका ॥ म्यांसांगीतल्याज्याज्या
योगधारणा ॥ मजभजतांत्याभावना ॥ त्यात्यासिद्धीत्यासीजा
णा ॥ पूर्वोक्तिलक्षणाउपजती ॥ ७७ ॥ अनेकभावनाधरितां
चित्ती ॥ त्यात्याधारणेच्यावीत्पती ॥ अनेकासिद्धींहोयप्रा
प्ती ॥ जाणनिश्चितीउद्धवा ॥ ७८ ॥ नानायोगधारणाव्युत्पति
॥ नकरितांसकळसिद्धीचीप्राप्ती ॥ येकेधारणेनिहोय


निश्चिती ॥ तेमीतुजप्रतिसांगेन ॥ ७९ ॥ श्लोक ॥ जितेंद्रियस्यदांत
स्याजितश्वासात्मनोमुनेः ॥ मद्धारणांधारयतःकासासिद्धिःसु
दुर्लभा ॥ ३२ ॥ टीका ॥ पांचपांचइंद्रियांचीजोडी ॥ जिणेनिशम
दमपरवडी ॥ उभवुनिवैराग्याचीगुढी ॥ प्राणापानवोढीजिं
किल्या ॥ ८० ॥ विवेकाचेनिबळेंजाण ॥ हत्तिराखोनिसावधा
न ॥ सदाकरितामाझेंमनन ॥ मननेमनजिंकिलें ॥ ८१ ॥ याप
रिगासाधकांसी ॥ धारणाधरुनीमानसी ॥ मीयेकध्याता
अहर्निशी ॥ सकळसिद्धीदासीत्यासीहोती ॥ ८२ ॥ सांडनि
सकळउपाये ॥ मीयेकुध्यानीधरिल्यापाहे ॥ साधकांसि

काहीउणेंआहे ॥ दुर्लभकायेसिद्धीचे ॥ ८३ ॥ माझेंभजनेंसा
वकाशी ॥ सिद्धीप्रकटतीसाधकासि ॥ त्यासेंमानरू
तीत्यासी ॥ तेचिरूषीकेशीसांगत ॥ ८४ ॥ श्लोक ॥ अंतरा ॥
यांन्चदंत्येतायुंजतोयोगमुत्तमं ॥ मयासंपद्यमानस्य
कालक्षपणहेतवः ॥ ३३ ॥ टीका ॥ अहेतुककरितांमाझें
भजन ॥ तेणेंसिद्धमाझीप्राप्तीजाए ॥ तेथेंसिद्धीवरिघा
लितामन ॥ आलीनागवणमत्प्राप्ती ॥ ८५ ॥ ज्यासिविषय
भोगलागेगोड ॥ तोचिसिद्धीचीवाहेचाड ॥ ज्यासिमा



झेप्राप्तीचेकोड ॥ तोवांछीनाबंडरिद्धीसिद्धीचे ॥ ८६ ॥ ज्यासिलोकि
कीअतिप्रतिष्टा ॥ तोसिद्धिच्यासोसीखटपटा ॥ ज्यासिमत्प्राप्तीविनि
ष्टा ॥ तोनवचेवाटासिद्धीच्या ॥ ८७ ॥ पावतपावतांवाराणसी ॥ जोवस्ती
गेलावेश्यागृहासी ॥ तेथेंभुलोनितीच्याभोगासि ॥ सर्वस्वतीसीस
मर्पी ॥ ८८ ॥ कृपासुनिजिवेंप्राणें ॥ सर्वथावेगळेंनाहीजाणें ऐसासंक
ल्पकरूनितेणें ॥ वश्यहोणेंवेश्येसि ॥ ८९ ॥ जवअसेगांठवडी ॥ तवं
तेत्यापासीखुडबुडी ॥ निःशेषवेचलयांकवडी ॥ बाहेरिदवडीतके
ळ ॥ ९० ॥ तोदवडितांहिनवजाये ॥ निर्लज्जनिसुगहोउनिराहे ॥
तरिआपणचिसांडुनिजाये ॥ तेस्पाचिपाहेमहासिद्धी ॥ ९१ ॥
सकळपापातेनिर्दळणे ॥ सकळकुळातेंउधरणे ॥ तकासी

॥२५॥ चेरवुंटखेपावनें वेश्यानागवणेभोगलिया ॥९२॥ तैसिचिसिद्धी
चीहिकथा ॥ मोक्षप्राप्तीसी प्रतिबंधुभूता ॥ मोक्षेज्ञानध्यानवैरा
ग्यवस्था ॥ नागउनिरित्यसांडिती ॥९३॥ मोक्षप्राप्तीनिकटजाण
॥ उठीसिद्धीचीनागवण ॥ भोगछळेव्यामोहकपण ॥ विलंबका
रणमस्त्राप्ती ॥९४॥ मोक्षस्वरूपअद्वैतता ॥ तेथेसिद्धीआनानाव
स्था ॥ तेमायेचिव्यामोहकता ॥ जाणतलतनाउद्धवा ॥९५॥ मोक्षप्रा
प्तीआडसिद्धीचेविघ्न ॥ हेतुजकळवियाजाण ॥ त्यासर्वसिद्धीचें
निरूपण ॥ समूळसंपूर्णसांगीतलें ॥९६॥ मोक्षाठाइंधरितांध्या
न ॥ येकाग्रताहोतांमन ॥ तेथेभोगलिप्सासिद्धीजाण ॥ करितीनाग
वणसाधकां ॥९७॥ सिद्धीप्राप्तीचेंकारण ॥ जन्मऔषधीमंत्रतप ॥२५॥

जाण ॥ कीसाधस्यांप्राणपान ॥ सकळ ॥ सिद्धीजाणयोगाभ्या
सी ॥९८॥ श्लोक ॥ जन्मौषधीतपोमंत्रैर्यावतीरिह सिद्धयः
॥ योगेनाप्नोतिताः सर्वाः नान्यैर्योगगतिंव्रजेत् ॥३५॥ टीका ॥
येकीजन्मास्तवसहजसिद्धी ॥ येकीत्यांसाधितांऔषधी
॥ येकीत्यातपादिमहाविधी ॥ येकीत्यामंत्रशुद्धीमंत्रद्वारा
॥९९॥ सर्पासिवायूधारण ॥ मीनासिजळतरण ॥ पक्षीया
सिनभोगमन ॥ हेजन्मसिद्धीजाणस्वाभाविक ॥१००॥ हं
सनिवडीक्षीरनीर ॥ कोकीळेसिमधुरस्वर ॥ चंद्रामृतशे
वीचकोर ॥ हेसिद्धिसाचारजन्मास्तव ॥१॥ याजन्मा

२५ ॥ त्नवसहजसिद्धी ॥ त्याम्यासंगीतत्यासुबुद्धी ॥ आतांसाधि
लयांऔषधी ॥ लाभतीसिद्धी त्यापैका ॥ २ ॥ स्वेतमांदारीगजा
नन ॥ अंगारकचतुर्थीसाधिल्यांजाण ॥ सकळविद्याचे
होयज्ञान ॥ धनधान्यसंमृद्धी ॥ ३ ॥ अजाणवृक्षाचेवोळख
ण त्याचीफळेंखाणेंमुखेजाण ॥ त्याचेंघडल्यांक्षीरपा
न होयआपणअजरामर ॥ ४ ॥ पिचुवंदनित्यसेविल्यादेख
॥ त्यासीबाधीनाकोळ्कीविख ॥ पाताळगरूडाचेप्रासि
ल्यांविख ॥ त्यासिदेहदुःखबाधीना ॥ ५ ॥ पुतिकावृक्ष
वेमळी ॥ असहाशक्तीचीपूतळी ॥ तेसाधल्यांअपारा ॥२५॥
म